# जाहिरात



**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान**
**जिल्हा अभियान व्यवस्थापक कक्ष, लातूर**
**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालय, जिल्हा परिषद परिसर, लातूर**

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान,लातूर, कंत्राटी पदभरती - 2018
दूरध्वनी क्रमांक - 02382 243524 ईमेल - pddrda.latur@gmail.com
जा.क्र.एमएसआरएलएम / लातूर / /2018 दिनांक /05/2018

1. मा. मु.का.अ.महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, मुंबई यांचे पत्र क्र.एमएसआरएलएम /HR/प्र.क्र.41/656/दि.15/03/ 2018
2. मा. मु.का.अ.महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, मुंबई यांचे पत्र क्र. एमएसआरएलएम /HR/प्र.क्र.40/657/दि.15/03/ 2018

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नोन्नती अभियानांतर्गत जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष लातूर मार्फत Intensive जिल्हयात स्वयंसहाय्यता समुहाची स्थापना, सक्षमीकरण, बळकटीकरण,संगोपन, क्षमता बांधणी इ. कामे करण्यासाठी कंत्राटी पध्दतीने 11 महिन्याच्या कलावधीकरिता जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष व तालुका अभियान व्यवस्थापन कक्षातील प्रभागसमन्वयक व सहाय्यक कर्मचाऱ्यांची खालील रिक्त असलेली पदे भरण्याकरिता अर्ज www.zplatur.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत असून Online पध्दतीने दिनांक 6 / 6/2018 ते दिनांक 21 / 6 /2018 पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

## वेळापत्रक

| अ.क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| 1 | अर्ज सादर करण्याची तारीख | 6.06.18 ते 21.06.2018 |
| 2 | सर्व पदांच्या लेखी परीक्षेसाठी अंतिम पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | 22.06.2018 |
| 3 | सर्व पदासाठी लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र | 27.06.2018 |
| 4 | सर्व पदासाठी लेखी परिक्षा दिनांक | 1.07.2018 |
| 5 | सर्व पदासाठी लेखी परीक्षेचा निकाल जाहीर करणे | 2.07.2018 |
| 6 | सर्व पदासाठी लेखी परिक्षा उत्तीर्ण उमेदवारांची यादी जाहीर करणे | 3.07.2018 |
| 7 | प्रभाग समवयक पदासाठी लेखी परिक्षा उत्तीर्ण उमेदवारांच्या कागदपत्रांची छाननी करणे | 9.07.2018 ते 11.07.2018 |
| 8 | इतर सहाय्यक पदासाठी लेखी परिक्षा उत्तीर्ण उमेदवारांच्या कागदपत्रांची छाननी करणे | 12.07.2018 ते 13.07.2018 |
| 9 | मौखिक परीक्षांचे आयोजन (फक्त प्रभाग समन्वयक) | 16/07/2018 ते 18.07.2018 |
| 10 | सर्व पदांची अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करणे | 19.07.2018 |
| 11 | नियुक्तीसाठी समुपदेशन | 24.07.2018 ते 25.07.2018 |

उपरोक्त वेळापत्रकामध्ये होणाऱ्या बदलाबाबत संकेत स्थळावर वेळोवेळी खात्री करण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

**1. उपलब्ध पदसंख्या - आरक्षणानुसार भरावयाच्या पदांचा तपशिल खालील प्रमाणे**

| अ. क्र | पदाचे नाव | पदसंख्या | जातीचा प्रवर्ग | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अजा | अज | विजअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | खुला | एकुण |
| 1 | प्रभाग समन्वयक | 55 | 8 | 4 | 2 | 1 | 2 | 1 | 1 | 10 | 26 | 55 |
| 2 | लेखापाल | 01 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 01 | 01 |
| 3 | प्रशासन सहाय्यक | 01 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 01 | 01 |
| 4 | प्रशासन / लेखा सहाय्यक | 10 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 05 | 10 |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | डाटा एंट्री ऑपरेटर | 11 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 06 | 11 |
| 6 | शिपाई | 11 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 06 | 11 |
| | **एकुण** | **89** | **11** | **07** | **05** | **01** | **02** | **01** | **01** | **16** | **45** | **89** |

PAGE 2

## समांतर आरक्षण तपशिल

| अ. क्र | पदाचे नाव | विवरण | समांतर आरक्षण | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अजा | अज | विजअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | खुला | एकुण |
| 1 | प्रभाग समन्वयक | अपंग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| | | महिला | 2 | 1 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 8 | 15 |
| 2 | प्रशासन सहाय्यक | अपंग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | महिला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 3 | लेखापाल | अपंग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | महिला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 4 | प्रशासन / लेखा सहाय्यक | अपंग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | महिला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 2 | 3 |
| 5 | डाटा ऐंट्री ऑपरेटर | अपंग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | महिला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 2 | 3 |
| 6. | शिपाई | अपंग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | महिला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 2 | 3 |
| | **एकुण** | **अपंग** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **1** | **0** | **1** |
| | | **महिला** | **2** | **1** | **1** | **0** | **1** | **0** | **0** | **5** | **14** | **24** |

**टिप -**

वरीलप्रमाणे पदाचा अर्ज करणेसाठी मागासवर्गीय प्रवर्गासाठी रू. 274/- व खुल्या प्रवर्गासाठी रू. 374/- इतकी परीक्षा शुल्क Online भरावे लागेल.

1. उपरोक्त अ.क्र. 1 ते 6 मध्ये दर्शविलेल्या पदसंख्येमध्ये वाढ किंवा घट होण्याची शक्यता असून सर्व अधिकार अध्यक्ष निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर यांनी राखून ठेवले आहेत.

**2. उमेद MSRLM अंतर्गत जिल्हा व तालुकास्तरीय पदांसाठी शैक्षणीक पात्रता विषयक अटी-**

| अ.क्र | पदाचे नाव व मानधन | शैक्षणीक पात्रता | अनुभव |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1. | प्रभाग समन्वयक<br>Cluster Co-Ordinator<br>(मानधन - रु.20500) | 1. पदवी परिक्षा उत्तीर्ण<br>2.BSW किंवा Bsc Agriculture किंवा MSW किंवा MBA किंवा PG in Rural Development किंवा PG in Rural Management यापैकी शैक्षणीक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य राहिल.<br>3. संगणक व लॅपटॉप हाताळणीचे ज्ञान असणे आवश्यक | पदवी परिक्षा उत्तीर्ण केल्यानंतरचा जोखीम प्रवण गट (महिला, अपंग,SC/ST सह ) सामाजिक प्रवर्तन व संस्थीय बांधणी विषयक कामाचा कमीत कमी 3 वर्षाचा ग्रामीण विकास, सामाजिक प्रवर्तन, गरिबी निर्मूलन, उपजिविका विकास कार्यक्रमाचा अनुभव आवश्यक |
| | | **जिल्हा अभियान कक्षातील पदे** | |
| 2. | प्रशासन सहाय्यक<br>Admin Assistant<br>( मानधन रु.15000/-) | 1. कोणत्याही शाखेतील पदवी<br>2.इंग्रजी टंकलेखन वेग 40 प्रति मिनिट शब्द आणि मराठी टंकलेखन वेग 30 प्रति मिनिट शब्द परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>3.MSCIT किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक | पदवीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर किमान 3 वर्ष प्रशासकीय कामाचा अनुभव |

| | | | |
|---|---|---|---|
| 3. | लेखापाल Accountant (मानधन रु.15000/-) | 1. मान्यता प्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेतील पदवी/ पदव्युत्तर पदवी<br>2. MSCIT किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण आवश्यक<br>3. Tally ची परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. | पदवीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर किमान 3 वर्ष लेखाविषयक कामाचा अनुभव |

PAGE 3

| | | | |
|---|---|---|---|
| 4. | डाटा ऐंट्री ऑपरेटर Data Entry Operator (मानधन रु.10,000/-) | 1.माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण<br>2.इंग्रजी टंकलेखन वेग 40 प्रति मिनिट शब्द आणि मराठी टंकलेखन वेग 30 प्रति मिनिट शब्द परीक्षा उत्तीर्ण<br>3.MSCIT किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण आवश्यक | माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान 3 वर्ष डाटा ऐंट्री ऑपरेटर(संगणक परिचालन) कामाचा अनुभव |
| 5. | शिपाई Peon (मानधन रु. 8000/-) | 10 वी ची परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | 10 वी ची परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान 3 वर्ष शासकीय कार्यालय / संस्था/ कंपनी मधील कामाचा अनुभव आवश्यक |
| | **तालुका अभियान कक्षातील पदे** | | |
| 6. | प्रशासन / लेखा सहाय्यक Admin & Account Assistant ( मानधन रु.15000/-) | 1. वाणिज्य शाखेतील पदवी<br>2.इंग्रजी टं कलेखन वेग 40 प्रति मिनि ट शब्द आणि मराठी टं कलेखन वेग 30 प्रति मिनि ट शब्द परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>3.MSCIT किंवा समकक्ष परीक्षा उत्तीण आवश्यक<br>4.Tally ची परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. | पदवीची परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान 3 वर्ष प्रशासकीय व लेखा विषयक कामाचा अनुभव |
| 7. | डाटा ऐंट्री ऑपरेटर Data Entry Operator (मानधन रु.10,000/-) | 1.माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण<br>2.इंग्रजी टंकलेखन वेग 40 प्रति मिनि ट शब्द आणि मराठी टंकलेखन वेग 30 प्रति मिनि ट शब्द परीक्षा उत्तीर्ण<br>3.MSCIT किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण आवश्यक | माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान 3 वर्ष डाटा ऐंट्री ऑपरेटर(संगणक परिचालन) कामाचा अनुभव |
| 8. | शिपाई Peon (मानधन रु. 8000/-) | 10 वी ची परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | 10 वी ची परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान 3 वर्ष शासकीय कार्यालय / संस्था/ कंपनी मधील कामाचा अनुभव आवश्यक |

3. **वयोमर्यादा** -

वरील सर्व पदांसाठी किमान व कमाल वय हे ज्या महिन्यात भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे त्या महिन्याच्या एक तारखेस उमेदवाराचे वय व अनुभव परिगणित करण्यात येईल. सर्वसाधारण उमेदवाराचे वय किमान 18 वर्ष व कमाल 38 वर्ष तसेच मागासवर्गीय उमेदवारांचे किमान वय 18 वर्ष व कमाल वय 43 वर्ष यापेक्षा जास्त असू नये.

3.1 अपंग उमेदवारासाठी - 45 वर्षापर्यंत

4. **प्रवेशपत्र -**

जाहिरातीतील नमुद पदाकरिता परिक्षा प्रवेश पत्र www.zplatur.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर पत्र पोस्टाने पाठविले जाणार नाही परिक्षेच्या वेळी उमेदवारांनी प्रवेश प्रमाणपत्र आणणे आनिवार्य आहे. उमेदवाराने प्रवेशपत्राशिवाय स्वतः चे छायाचित्र असलेले ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहिल (उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र ,वाहन परवाना)



**5.परिक्षेचे स्वरुप व निवड पध्दती**

| अ.क्र. | पदाचे नाव | गुण |
|---|---|---|
| 1. | प्रभाग समन्वयक | (80 लेखी व मुलाखत 20 असे एकुण 100 गुण) |
| 2. | 1. लेखापाल<br>2. प्रशासन सहाय्यक<br>3. प्रशासन / लेखा सहाय्यक<br>4. डाटा ऐंट्री आॅपरेटर<br>5. शिपाई | 100 लेखी गुण |

5.1. लेखी परिक्षा वस्तूनिष्ठ बहूपर्यायी स्वरुपाची असेल. निगेटिव्ह मार्कींग पध्दत असणार नाही.

वरील पैकी प्रभाग समन्वयक या पदाकरिता दिनांक 15/03/2018 च्या पत्रान्वये लेखी परिक्षेमध्ये मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बौध्दीक चाचणी, सामाजिक शास्त्रे व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या घटकांवर / विषयावर आधारीत 80 गुणांची लेखी परिक्षा व 20 गुणांची मुलाखत घेवून गुणवत्तेच्या आधारे निवड करण्यात येईल.

प्रशासन / लेखा सहाय्यक, प्रशासन सहाय्यक, डाटा ऐंट्री ऑपरेटर, शिपाई या पदाकरिता दिनांक 15/03/2018 च्या पत्रान्वये लेखी परिक्षेमध्ये मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बौध्दीक चाचणी, सामाजिक शास्त्रे व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या घटकांवर / विषयावर आधारीत याप्रमाणे 100 गुणांची लेखी परिक्षा असून गुणानुक्रमे उमेदवाराची निवड करण्यात येईल.

5.2. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि. 19.10.2007 मधील परिच्छेद क्रमांक 6 (2) नुसार ज्या पदाकरिता पदवी ही कमीत कमी अर्हता आहे अशा पदांकरिता परिक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या पदवी परिक्षेच्या दर्जाच्या समान राहील परंतू मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या (इयत्ता 12 वी) समान राहील.

5.3 परिक्षेचा निकाल तयार करताना ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रनिमं/1215(प्र.क्र.55/ 15) /13-अ दिनांक 5.10.2015 मधील निकषावर लावला जाईल.

5.4.शासन परिपत्रक क्र. - एसआर व्ही 2017/ प्रक्र31/98/*16-अ दि. 16 मार्च1999 तसेच शासन परिपत्रक क्रमांक एस.आर.व्ही 2012 प्रक्र 16/12/16-अ दिनांक 13 ऑगष्ट 2014 मधील तरतूदीनुसार समांतर आरक्षण कार्यान्वित करण्यासाठी विहित केलेली कार्यपध्दती अनुसरली जाईल.

6. **सर्व पदाकरिता सर्वसाधारण अटी व शर्ती**

- अनुसचित जाती व जमाती वगळता विमुक्त जाती ...

... विमुक्त जाती भटक्या जमाती इतर मागासवर्गीय व विशेष मागासप्रवर्ग यामधील उमेदवारांनी आरक्षणाचा लाभ मिळवण्यासाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत सक्षम अधिकाऱ्याचे मार्च 2018 चे दिनांकास वैध असणारे नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहिल.

- महिलांच्या आरक्षणाबाबत शासननिर्णय महिला व बालकल्याण विभाग क्र. 82/2001 /मसेआ00/प्र.क्र.415/ का-2/ दि.25 मे 2001 मधील तरतूदीनुसार खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांना सदर शासन निर्णयात परिशिष्ट - 3 मध्ये दिलेले खुल्या प्रवर्गात उन्नती व्यक्ती / गट (क्रिमिलेअर) यामध्ये मोडत नसल्याचे सक्षम
अधिकाऱ्याचे कागदपत्र तपासणीचे दिनांकास वैध असणारे नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.तसेच पुरेशा प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास इतरत्र आदलाबदल न करता पुरुष उमेदवारांमधून राखीव असलेली पदे भरता येतील.

PAGE 5

- सामान्य प्रशासन अधिसुचना क्रमांक एसआरव्हि-2000/प्रक्र.(17/2000)12दिनांक 28 मार्च 2005 व सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक /प्रक्र.17/2000/12 दिनांक 1 जुलै 2005 नुसार लहान कुटुंब असल्याचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र अर्जा सोबत सादर करणे आवश्यक आहे.(अविवाहित उमेदवांरांनी सुध्दा लागू नाही असे नमूद करून सदर प्रतिज्ञा पत्र सादर करणे आवश्यक आहे.)
- सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक बीसीसी 2011/प्र.क्र.1064/2011/16-ब दिनांक 12 डिसेंबर 2011 नुसार मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना त्यांचे जात वैधता प्रमाण पत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून 6 महिण्याच्या आत सादर करण्याच्या अटीवर व मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाचे अधीन राहून नियुक्ती दिली जाईल. 6 महिण्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्रसाठी परिपूर्ण प्रस्ताव कार्यालया मार्फत समितीकडे सादर करून जात वैधता प्रमाण पत्र सादर न केल्यास कोणतीही नोटीस न देता सेवा समाप्त करण्यात येईल.
- निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेद्‌वारांने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती किंवा कागदपत्र खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास किंवा त्याचे पुर्व चरित्र बरोबर नसल्याचे आढळल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर रद्द करण्यात येईल किंवा नियुक्ती दिल्यानंतर निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती रद्द करण्यात येईल व त्यानंतर या बाबत उमेदवाराचा कोणत्याही प्रकारचा तक्रार ऐकूण घेतली जाणार नाही.
- या जाहिरातीतील नमुद केलेल्या पदावर उमेदवाराची निवड न्यायालयीन निर्णय शासनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशाच्या आधिन असेल.
- उमेदवार हा महाराष्ट्रातील मूळ रहिवासी असावा उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याने डोमिसीअल प्रमाणपत्र प्राधिकृत अधिका-याकडून घेतलेले असावे. अधिवास प्रमाणपत्र नसल्यास महाराष्ट्रातील जन्माचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील. उपरोक्त बाबत शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.
- शासकीय / निमशासकीय कर्मचा-यानी त्याच्या नियुक्ती प्राधिका-याची परवानगी घेऊन अर्ज करावा. निवड झालेल्या उमेदवारांना सदर पत्राची प्रत प्रमाणपत्र तपासणी वेळी सादर करावी लागेल.
- सदर पदाची नेमणूक ही पूर्णतः कंत्राटी पध्दतीने असेल

- या पदावरील कर्मचा-यांना कायम शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही

**जिल्हा अभियान व्यवस्थापक**
**जिल्हा अभियान कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान लातूर**

**मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. तथा**
**जिल्हा अभियान संचालक,**
**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान लातूर**